REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 5 | FEBRUARY - 2018

# मराठी ग्रामीण कादंबऱ्यांमधून व्यक्त झालेले दुष्काळी परिस्थितील सामाजिक सहसंबंध

डॉ. संभाजी मलघे
इंद्रायणी महाविद्यालय, तळेगाव दाभाडे,पुणे.

**सारांश—**

मराठी ग्रामीण कादंबऱ्यांमधून दुष्काळी परिस्थितीचे वर्णन आले आहे. काही कादंबऱ्यांमधून मोठ्या दुष्काळाची वर्णने आली आहेत, तर काही कादंबऱ्यांमधून एखाद्या तालुक्यातील जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीचे वर्णन केले आहे. प्रदेशाप्रमाणे दुष्काळाची तीव्रता कमी अधिक असते. दुष्काळाचे चटके आर्थिक संपन्नता असलेल्या समुहाला कमी प्रमाणात वाट्याला येतात, तर आर्थिक दृष्ट्या कमकुवत असलेल्या समुहाला तो अधिकच तीव्रतेने जाणवत असतो. हे न नाकारता येणारे उघड असे सत्य आहे.

## प्रस्तावना—

'समाज' हा कधीही, कोणत्याही स्वरुपात एकजीव नसतो. समाजातील विविध घटकांमधील असमानतेमुळे तो आतून खंडीत झालेला असतो. राष्ट्रीय पातळींपासून ते गाव—पाड्यापर्यंत हेच चित्र दिसते. जातीव्यवस्थेने जातीं—जातीत विविध प्रकारची विभिन्नता, श्रेष्ठ—कनिष्ठतेची भावना, रोटी—बेटी व्यवहारामधील विविध नियम आणि अडचणी, आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक, राजकीय आणि सांस्कृतिदृष्ट्या असणारी विषमता यामुळे दुष्काळासारख्या सर्वव्यापी जटील समस्येला तोंड देतानाही 'माणूस' म्हणून तर सोडाच परंतु एका देशाचे नागरिक, एका प्राप्त—परिसरातील नागरिक म्हणूनही सौहार्दपूर्ण संबंध कधी निर्माण झालेले दिसत नाहीत, उलट धार्मिकता, आर्थिक विषमता आणि राजकीय वर्चस्वामुळे ताणतणावच समाजाच्या वाट्याला आलेले दिसतात हे नाकारता येत नाही.

'दुष्काळ' या समाजव्यापी समस्येला तोंड देताना समाज—समूह मानसिक दृष्ट्या एकसंघ असतो का? दुष्काळी काळात सामाजिक सहसंबंधाचे स्वरूप नेमके कसे असते? याबाबत ग्रामीण कादंबरीकारांचे काय आकलन आहे, आणि त्यांचे आकलन नेमके कशाप्रकारे आपल्या कादंबऱ्यांमधून मांडले आहे? या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. यासाठी मराठीतील निवडक ग्रामीण कादंबऱ्यांचा विचार केला आहे.

या मराठी ग्रामीण कांदबऱ्यांमधून दुष्काळी परिस्थितीत व्यक्त झालेले सामाजिक सहसंबंध न्याहाळता येतील.



## सामाजिक सहसंबंधावर परिणाम करणारे घटक : स्वरुप आणि व्याप्ती

सामाजिक सहसंबंध म्हणजे समाजातील विविध प्रकारच्या समुहाचे आपापसातील संबंध. भारतीय समाज हा विविध प्रकारच्या विषमतांनी मिळून तयार झालेला आहे. यामध्ये जातीव्यवस्था, आर्थिक विषमता, सामाजिक पातळ्यांवरच्या विविध प्रकारच्या विषमता उदा. रोटी व्यवहार, बेटी व्यवहार, जन्म ते मृत्यू या दरम्यान विविध रुढी, श्रद्धा, परंपरा यामधील विषमता, धार्मिक विषमता यांचा समावेश होतो. या सर्व घटकांच्या भल्या—बुऱ्या

परिणमांमधून सहसंबंध निर्माण झालेले असतात. सहसंबंध पाहताना या घटकांचा विचार अपरिहार्यपणे करावा लागतो. साहित्य निर्माण करणारा साहित्यिक याच वातावरणात राहून साहित्यनिर्मिती करत असतो. ''साहित्यनिर्मिती ही निर्वात पोकळीत घडणारी गोष्ट नसून विशिष्ट स्थलकालात जगणाऱ्या एका लेखकाची निर्मिती असते. लेखक म्हणून जगणारी ती व्यक्ती ज्या समाजात जगत असते, त्या समाजासाठी त्याची कलानिर्मिती झालेली असते. निर्मित कलेच्या द्वारे कलावंताने आपल्या भोवतालच्या समाजवास्तवाशी प्रतिसादात्मक नाते प्रस्थापित केलेले असते.''[1] दुष्काळी परिस्थितीत हे समाजवास्तव गृहीत धरुन माणसामाणसांमधील सहसंबंधामध्ये कोणते बदल होतात, कसे होतात याबाबत ग्रामीण कादंबऱ्यांमधील चित्रण तपासावे लागणार आहे.

शेतकऱ्याचे जीवन, शेती बेभरवशाचे आहे. सर्वात जास्त नाडला जातो तो शेतकरी. त्याला सामाजिक सहसंबंध जपावे लागतात. ते जपण्यापायी त्यालाच भुर्दंड सहन करावा लागतो. शंभर सव्वाशे वर्षांपूर्वीची दुष्काळातली शेतकऱ्याची स्थिती त्रिं.ना. आत्रे यांनी 'गावगाडा' मध्ये मांडली आहे. ''सर्व बलुत्येआलुत्ये व भटक्ये त्यांच्या शेतातले गवत–बाटुक काढतात, रात्री चोरतात आणि त्यावर आपली गुरे पोसतात किंवा त्याचे टक्के करतात. गाढवाडुकरांना कधी दावे नसते व त्यांना उचलून चारा कोणी टाकीत नाही. त्यामुळे परीट, कुंभार, पाथरट, वैदू वगैरेंची गाढवे आणि वडार कोल्हाटी यांची डुकरे ह्यांची शेतात नेहमी वर्दळ असते. तेंव्हा आज स्थिती अशी आहे की, कुणबी ओरडतो माझे बैल उपाशी मरतात. 10–20 रुपये शेकड्याप्रमाणे मला कडबा विकत घ्यावा लागतो, दोन–दोन कोस पायपीट केली तरी कुऱ्हाडीच्या दांड्याजोगे सरळ किंवा हळसाजोगे बाकदार लाकूड भेटत नाही, बाकी सारी दुनिया शेतातील चारा, तरवड, केकताड, फाटी फुकट म्हणून बेसुमार लुटते नव्हे कनिष्ठ जाती त्याचे पैसे करतात आणि हा कपाळ झोडतो की, चाऱ्यासरपणाचा दुष्काळ पडला.''[2] हेच भीषण दुष्काळाचित्र आजही कमी अधिक तीव्रतेने महाराष्ट्रात पहायला मिळते.

सव्वाशे दिडशे वर्षांपूर्वी बलुतेदारी पद्धती असताना कुणब्याच्या पिकामध्ये अनेक वाटेकरी असायचे. सर्वांचे वाटे दिल्यानंतर उरलेले धान्य शेतऱ्याच्या पदरात पडायचे. आज हे 'भागतकरी' राहिलेले नाहीत, मात्र शासकीय अधिकाऱ्यांकडून शेतकरी नडले जातात. शेतात पिकणाऱ्या पिकाचा वाटा पैशाच्या रुपातून त्यांना घ्यावा लागतो. खते, बी–बियाणे यासाठी त्याला झगडावे लागते. दुष्काळात शासनाकडून जाहीर होणारी मदत त्याच्यापर्यंत पोहचते तो अर्धिमुर्धी? म्हणजे इतकी वर्ष झाली तरी शेतकऱ्याची अवस्था आहे. तशीच आहे. दुष्काळाचे परिणाम पूर्वी जसे होते तसे ते राहिलेले नाहीत, तर ते परिणाम अधिक उग्र, अधिक दाहक आणि असह्य झालेले आहेत. दुष्काळ या नैसर्गिक आपत्तीत समाजाच्या विषमतेची, त्यांच्या परिणामांची अधिक भर पडली आहे. अल्पभूधारक, कोरडवाहू, निमबागायती, बागायती आणि धनिक शेती करणारा, व्यापारी तत्त्वाने शेती करणारा व्यापारी शेतकरी असेही गट निर्माण झाले आहेत. या सर्व गटातील शेतकऱ्यांना दुष्काळाच्या झळा सारख्याच तीव्रतेने जाणवतात का? दुष्काळाची तीव्रता काहींना अधिक जाणवते. तर काहींना कमी असे होते की? अशी तीव्रता काही शेतकऱ्यांना वाट्याला येत असेल तर त्यामागची सामाजिक कारणे कोणती आहेत? या सर्व विषम परिस्थितीत आणि शिवाय दुष्काळ असताना सामाजिक सहसंबंधाचे स्वरूप नेमके कसे असते? ते कुठे आणि कसे बदलते? आणि का बदलते? याचे आकलन करण्याचा प्रयत्न हे याचा शोध हे या शोधनिबंधाचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे.

मराठी ग्रामीण कादंबरीकारांनी दुष्काळाचे वर्णन करीत असताना, वास्तव परिस्थती टिपत असताना याविषयी कोणती निरिक्षणे नोंदविली आहेत? त्यांचे आकलन नेमके काय आहे? याचा शोध घेतला जाईल. या शोधासाठी वरील पार्श्वभूमी विचारात घेतली जाईल.

'रानखळगी'– भीमराव वाघचौरे, 'जगणं असं तोलाचं'– शेषराव मोहिते, 'ऐसे कुणबी भूपाळ'– भारत काळे या कादंबरीकारांच्या कादंबऱ्यांमधून या प्रश्नांच्या उत्तरांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

## 'रानखळगी' (भीमराव वाघचौरे)

'रानखळगी' ही भीमराव वाघचौरे यांची ग्रामीण कादंबरी. या कादंबरीमध्ये त्यांनी दुष्काळामुळे निर्माण होणारी परिस्थिती वर्णन करून सांगितली आहे. दुष्काळामुळे कुटुंबातील माणसांमध्ये समज–गैरसमज निर्माण होतात. समस्यांनी त्रस्त झालेली माणसं आपल्या मनावरचं नियंत्रण घालवून बसतात. जसं जवळच्या माणसांच्या बाबतीत घडतं तसंच आजुबाजूच्या आणि गावातल्या माणसांच्या बाबतीत घडताना दिसतं. माणसं माणसांशी माणुसकीच्या नात्याने वागत नाहीत. गावातील माणसांमध्येही असेच वातावरण निर्माण होते. नात्यांचा मान राखला जात नाही गावातील माणसे स्वतःपुरतं पाहतात. माणसांची मने दगडी बनतात कारण प्रश्न आपल्या माणसांना जगविण्याचा असतो.

'रानखळगी' मधून माणसांचे प्राण्यांमध्ये वागणे किती भयानकपणे व्यक्त होते ते दाखवून दिले आहे. ''तशी सडकाच्या कामाची बी भणभणच व्हती. मुकादम तोंड पाहून काम देत व्हता कवा कवा तर कामावरुन हुबली व्हायच्या आन वरचा साहेब येऊस्तोर कामबंद पडायचं. काम बंद पडलं म्हंजी आठुडयालाच कामाचं माप कमी पसायचं आन् मंग पगारबी कमी व्हायचा. पुऱ्या आठुड्यालाच तडा जायचा.''[3] उपाशी जनावरे जशी खाण्यासाठी तुडून पडतात, एकमेकांवर गुरगुरतात. हल्ले करतात. तशी दुष्काळाने माणसांची अवस्था केलेली दिसते. माणसांच्या कामासाठी 'हुदबी होणे' यामधून सारे व्यक्त होते. हाताला काम मिळाले तर त्याचा दाम मिळणार, या दामातून दाणे आणता येणार, या दाण्यांनी पोटाची भूक शमणार हे सर्वांना माहीत आहे, म्हणून ते काम मिळण्यासाठी मारामार होत होती या वास्तवाला भीमराव वाघचौरे यांनी व्यक्त केले आहे.

दुष्काळामध्ये माणसामाणसांमधील विश्वासाने आजपर्यंत जपलेले व्यावहारिक संबंधही पूर्णपणे बिघडून जातात याकडे त्यांनी लक्ष वेधले आहे. गावातील वाणी, दुकानदार दुष्काळाच्या अगोदर बिनदिक्कीतपणे गावातल्या गरीबांना उधारीवर धान्य देत होते. मात्र दुष्काळ पडल्यामुळे माणसांची पतही नाहीसी होते आणि विश्वास ठेवण्यासारखीही परिस्थिती रहात नाही. या गरीब माणसांना किलोभर धान्य देतानाही मागेपुढे पाहिले जाते. मागच्या उधारीविषयी उणदुणे बोलणे दिले जाते. दुष्काळामुळे लाचार झालेली माणसे उणेदुणे सहन करताना दिसतात. हे सहन करणे एवढाच पर्याय त्यांच्यापुढे असतो. अन्य सर्व मार्ग बंद झालेले असतात.

दुष्काळामुळे संबंधातली माणसेही तुसड्यासारखी वागू लागतात. एकमेकांना मदत करण्याची ऐपत, ताकद संपलेली असते. यामुळे कावलेली माणसे एकमेकांशी बोलत नाहीत. या साऱ्याच माणसांमध्ये तुटलेपणा आलेला दिसतो. सरकारदरबारी मिळणारे निकृष्ट गहू मिळवतानाही माणसे हैरान झालेली दिसतात. स्वतःची आणि स्वतःच्या माणसांची भूक शमवणे. दुष्काळातून राहण्यासाठी जे–जे म्हणून करावे लागते ते–ते करण्यासाठी माणसे तयार झालेली दिसतात. यापुढे माणसांना काही दिसत नाही म्हणून दुष्काळात कुटुंबातल्या माणसांचे, गावातील माणसांचे सहसंबंध अशाप्रकारे बिघडलेले दिसतात. याचे वर्णन करताना ते म्हणतात, ''खायला आपली ज्वारी, बाजरी मिळत नव्हती. दुष्काळाला तोंड दयायचं म्हून की काय पर सरकारनं कोंचे तरी अमेरिकेतून जड गहू बोलावले व्हते. बाजऱ्यापेक्षा ते बाजारात सस्ते मिळत होते. आज म्हून सम्दी दुष्काळी जनता त्याच्यावर तुटून पडत व्हती.''[4] माणसांचे हे चित्र भुकेमुळे झालेली माणसांची ही अवस्था दुष्काळामुळे माणसांचे वागणे असे झालेले दिसते.

## 'असं जगणं तोलाचं'– शेषराव मोहिते :

दुष्काळामध्ये कुणी कुणाला सहाय्य करत नाही. माणसं परक्यासारखी वागू लागतात. ज्याच्याकडे अपेक्षेने जावं ती माणसं मदत तर करीत नाहीत उलट वेगळा सल्ला देऊन सटकून जातात. जीवनावश्यक वस्तू उधारीवर देणारे दुकानदार दुष्काळामध्ये परक्यासारखे वागू लागतात. माणूसपणा विसरुन पक्के व्यवहारी होतात. माणसांपेक्षा पैसा महत्त्वाचा होतो, दुष्काळात माणसं अडचणीत आहेत. थोडीफार मदत करावी अशी माणुसपणाची वृत्ती हरवून बसते. निसर्गाच्या दुष्काळाबरोबर माणुसकीचाही दुष्काळ येतो असं म्हणण्याची वेळ आलेली दिसते.

'असं जगणं तोलाचं' या दुष्काळ वर्णन करणाऱ्या कादंबरीमध्ये असे प्रसंग आलेले आहेत. या प्रसंगांमधून, संवादामधून माणसामाणसांमधील बदलेल्या संबंधांची प्रचिती येते.

वाण्याकडे उधारी मागावी की न मागावी याविषयींच्या संवादातून हे स्पष्ट होते.

''तुला काय येड बिड लागलय का काय? गावात कोणच्याची पत्ती दियीना उदार, आन् उंबरग्याचा दुकानदार मला वळख ना पाळख खात देतोय व्हय गं!''

''मग गावात कुणाला उसने पासने मागून तर बगायचो व्हतो हे वडी बार.''

''तुका मागून बगिटलो नी वाटलालय का काय मनावं''

''कुणाला मागितलो?''

''भालू मास्तरला बगिटलो मागून. लई मास्तर आला की पुडं पुडं करीत आसतोय. शंभर खांड दिवून हातभार लावील वाटलं तर मलाच काडला येडयात.''[5]

गावातली तालेवार माणसं गरीबांबरोबर अशी वागू लागलेली दिसतात. माणसामाणसांमधील सारे संबंध दुष्काळामुळे दुरावलेले दिसतात. आपण जर उधारी दिली तर उधारीची रक्कम दुष्काळामुळे परत येण्याची शक्यता नाही उलट बुडण्याचीच जास्त शक्यता आहे. हे वास्तव दिसत असल्यामुळे देणारी माणसे अशी कोरडी झालेली दिसतात. माणसे अशाप्रकारे हतबल होताना दिसतात. अशा परिस्थितीत हात कुणापुढे पसरायचा? असा प्रश्न

त्यांच्यासमोर निर्माण झालेला दिसतो. गावातील हलक्या म्हणवणाऱ्या जाणाऱ्या जातीतल्या लोकांचं दुष्काळातलं जगणं अधिकच बिकट झालेलं दिसतं. कारण हे लोक अगोदरच जातीव्यवस्थेच्या दुःखाने पिळलेले आहेत. या दुष्काळात या पिचल्या लोकांचा कुणी वाली राहिलेला दिसत नाही. दुष्काळात शासकीय यंत्रणा ढिम्मपणे निष्क्रियतेने वावरत आहेत. म्हणून या काळात शासनातील लोकांविषयी लोकांच्या मनात संताप घुमसत असताना दिसतो. यामुळे शासनयंत्रणेतील लोक आणि दुष्काळात होरपळणारे लोक यांच्यामधील सामाजिक संबंध बिघडलेले दिसतात.

दुष्काळात एकमेकांचं दुःख वाटून घ्यायलाही माणसे तयार नाहीत. सहानुभूती व्यक्त करायला तयार नाहीत हेही चित्र कादंबरीकारांनी मांडले आहे.

''आज आसं कसं वाट चुकली मनावं माय.''

''वाट चुकायला काय झालं वैनी ही म्हागं दुष्काळ लागलाय न्हवं हात धिवून. खालतं वरतं कायी सुदरु दियना झालाय. हेवका कदी बाप जल्मी म्हायती न्हायी असले काय करावे लागलय.'' म्हणून त्येनं तळहातपुढे केला. दोन्ही हातावर खडी फोडून फोडं येऊन फुटलेले. हाताला दुखापती झालेल्या.''[6] कुणाजवळ तरी आपलं दुःख सांगावं अशी माणसही शिल्लक रहात नाहीत जवळची म्हणवणारी माणसं कोरड्या मनाची झालेली दिसतात. माणसामाणसांतील संवाद संपलेला दिसतो. रक्ताची किंवा मानलेली जी नाती असतात. ती नाती दुष्काळामुळे सैल झालेली दिसतात. माणसं माणसांकडे जायचं टाळू लागतात. आणि कशीबशी गेली तरी ठिक संवाद होत नाही एकमेकांचे म्हणणं समजून घ्यावं अशी मानसिकता रहात नसल्याचं दिसतं.

दुष्काळात गावातील माणसे एकमेकांशी तुटकपणे वागताना दिसतात. शेवटी गावात काही खायलाही करत नाही. माणसांचे आधारही रहात नाहीत अशावेळी गाव सोडून जगण्यासाठी बाहेर पडणं एवढचं हातात राहतं.

## 'ऐसे कुणबी भूपाळ'–भारत काळे :

भारत काळे यांनी 'ऐसे कुणबी भूपाळ' या ग्रामीण कादंबरीमध्ये ग्रामीण भागात दुष्काळात माणसे कसे वागतात हे नोंदविले आहे. माणसामाणसांमधील नाती खराब झाली तरी ती नाती जपत राहतात. शेतकरी अशी नाती जपण्याचा प्रयत्न करतात. या संबंधाविषयी भारत काळे म्हणतात. ''कितीही नासलं तरीही या नासलेपणालाच पुन्हा पुन्हा जपत होते. काय कारण असावं? या सगळ्या कुणबटांना आपलं नातंच तोडता येत नसेल का? की त्याला कधी नि कसं तोडायचं हे कळत नसावं? मग ते कितीही नासलं तरी त्याला जपत राहायचं.''[7] माणसामाणसांमधील नात्यांचं हे वास्तव स्वरूप दुष्काळात कोणतीही नाती शिल्लक रहात नाहीत. नाती नासून जातात म्हणजे कुणाकुणाची दखल घेत नाही. मोठेपणाचा मान राखला जात नाही शब्दांची किंमत कळत नाही. शब्दांची किंमत कवडीमोल होते. ही नाती ओझ्यांसारखी वाटू लागतात. शरीराचा नासलेला भाग काढून फेकून दयावा अशी परिस्थिती असते पण तो भाग तोडता येत नाही, फेकता येत नाही ही मजबुरी असते दुष्काळामुळे नाते जपण्याच्या बाबतीत माणसे अशीच मजबूर झालेली दिसतात.

एकीकडे ही नासकी नाती तर दुसरीकडे संताप आणणारे शासन आणि त्यांचे निर्णय! यामुळेही सामाजिक स्वास्थ्य बिघडलेले दिसते. कपाशीचे पिक घेणाऱ्या शेतकऱ्याच्या वाट्याला जे येते ते भोग भारत काळे यांनी जहाल भाषेत मांडले आहेत. ते म्हणतात– ''मायचा भोसडा या सरकारच्या काय त मनं अर्धे पैसे आता घ्या आन उरलेले पैसे तुमी मेल्याव तुमच्या दिवसाला कामी येतीन. त्या अर्ध्या पैस्यातून सोसायटी, भू–विकास, यायला काटून दया, आन् तुमी बंबूराखा.''[8] हा संताप हजारो शेतकऱ्यांना मनातील धगधगता संताप आहे. आटापिटा करून बी–बियाणे मिळवायचं. शेताची मशागत करून ते बियाणं शेतात कावायचं. डोळ्यात प्राण आणून पावसाची वाट पहायचं कसाबसा पाऊस झाल्यावा वाटणाऱ्या प्रत्येक रोपाला डोळ्यात तेल घालून जपायचं. कपाशीच्या बाबती जागायचं झालं तर व प्रत्येक बोंडाला जपायचं असा कापूस वेचायचा, जमा करायचा आणि शेवटी हातात पडणारा मोबदला मात्र अर्धा अशा प्रकारे नाडणाऱ्या शासनाविषयी शेतकरी आपल्या तीव्र भावना व्यक्त करताना दिसतात.

माणसामाणसांमधील संबंध अशाप्रकारे घडले–बिघडलेले दिसतात. डॉ. भास्कर शेळके म्हणतात– ''ग्रामीण परिसरात माणसाला तीन प्रकारच्या दुःखांना सामोरे जावे लागते– निसर्ग–निर्मित, समाजनिर्मित, मानवनिर्मित.''[9] दुष्काळामध्ये निसर्ग निर्मित दुःख शेतकऱ्यांच्या वाट्याला येते त्यामुळे शेतकरी हादरतात. भांबावून जातात. निसर्गापुढे काय चालणार? असा विचार करून संघर्षाला तयार होतात. समाजनिर्मित दुःखाच्या बाबतीत मात्र

त्यांची अशी मानसिकता दिसत नाही. कारण हे दुःख माणसांच्या स्वार्थामुळे, माणुसकीला काळीमा फासल्यामुळे शेतकऱ्यांच्या वाटयाला आले आहे. त्यामुळे अशा परिस्थितीत सामाजिक संबंध बिघडलेले दिसतात. आणि हे संबंध बिघडणे अपरिहार्य आहे, कारण माणसेच माणसांशी माणसांसारखी वागत नाहीत. दुष्काळात दुष्काळी कामाच्या पगाराचे वाटप करणारे अधिकारी गब्बर होतात. दुष्काळातही आपल्या बायकापोरांसाठी सोने खरेदी करतात हे वेगळे चित्र पहायला मिळते.

दुष्काळ पडल्यानंतर भाकरीचा प्रश्न सर्वात महत्त्वाचा प्रश्न होतो. या काळात आलेल्या सण उत्सवांना कोणताही अर्थ उरत नाही, रस उरत नाही. हे सण साजरे करण्याची मानसिकतादुष्काळाने केव्हाच हरवून टाकलेली असते. आर्थिक प्रश्नांमुळे मेटाकुटीला आलेले शेतकरी जगण्यासाठी वेगवेगळे पर्याय शोधताना दिसतात. यामुळे कौटुंबिक, सामाजिक संघर्ष निर्माण झालेले दिसतात.

शेती करणाऱ्या शेतकऱ्यांमधील छोट्या शेतकऱ्यांना दुष्काळाच्या झळा अधिक तीव्रतेने लागलेल्या दिसतात. त्यामुळे हे शेतकरी आपला परिसर सोडून दुसऱ्या प्रदेशाकडे निघतात. या विस्थापनामुळे नवे सामाजिक प्रश्न, समस्या निर्माण होतात. यामुळेही माणसामाणसांमधील संबंध ताणले गेलेले दिसतात. शेवटी डॉ. शरणकुमार लिंबाळे यांनी मांडलेला निष्कर्ष मान्य करावा लागतो. ''शेती चांगली स्थिती प्राप्त करून देते. मात्र दुष्काळ केवळ शारीरिक आरोग्य बिघडवत नसतो. तर आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक स्वास्थ्य संपवतो.''[10] हे स्वास्थ बिघडल्यामुळे मानवी संबंध बिघडतात.

मराठी ग्रामीण कादंबऱ्यांमधून हे होणारे सारे बदल टिपले आहेत. या अनुभवांचे स्वरूप वेगवेगळे असले तरी त्यामधून ढवळलेले समाजमत आणि विस्कळीत झालेले, बेरंगी झालेले सामाजिक सहसंबंधाचे भीषण चित्रच उभे राहते.

## संदर्भ–

1. ठाकूर रवींद्र, मराठी कादंबरी : समाजशास्त्रीय समीक्षा, दिलीपराज प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती 2007, पृ.25
2. आत्रे त्रिं. ना., गावगाडा, समन्वय प्रकाशन कोल्हापूर, आवृत्ती डिसेंबर 2012, पृ.149 व 150
3. वाघचौरे भीमराव, रानखळगी, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, दुसरी आवृत्ती 1997, पृ.107
4. वाघचौरे भीमराव, उपरोक्त, पृ.106
5. मोहिते शेषराव, असं जगणं तोलाचं, देशमुख आणि कंपनी, पहिली आवृत्ती 1994, पृ.252
6. मोहिते शेषराव, उपरोक्त, पृ.243
7. काळे भारत, ऐसे कुणबी भूपाळ, देशमुख आणि कंपनी, पहिली आवृत्ती 2001, पृ.452 व 453
8. काळे भारत, उपरोक्त, पृ.317
9. शेळके भास्कर, मराठी प्रादेशिक कादंबरी : स्वरूप आणि विश्लेषण, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्रथम आवृत्ती 2012, पृ.86
10. डॉ. लिंबाळे शरणकुमार, साठोत्तरी मराठी साहित्यातील प्रवाह, दिलीपराज प्रकाशन, पुणे, आवृत्ती 2007, पृ.84